Lalita Gandbhir
4200 North Ocean Dr.
1501 - 2
Singer Island, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
One Time Serial Rights

# ममी मॅच्युअर होते !

भल्या पहाटे पाच वाजता दरवाजावरची घंटी वाजली.

“तू” रजनीने डोळे उघडायचा प्रयत्न करत दिनेशला म्हटलं.

“मी नाही, तू. मागच्या वेळी मी उठलो होतो” त्याचं झोपाळू उत्तर आलं.

मागची वेळ रजनीच्या स्मृतीत हरवली होती. ती आठवायचा प्रयत्न करत रजनी म्हणाली, “मागची कुठली वेळ ?”

उत्तराऐवजी घोरण्याचा आवाज आला.

टन् टन् टन् आता सतत चालू झालं.

मागची वेळ आठवण्यात यश येतच नव्हतं. शेवटी मेंदूने रजनीला इशारा दिला, “मागची वेळ आठवून वाद घालण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा दार उघडणं सोपं आहे.”

इशाऱ्याला टन् टनची साथ होती.

रजनी चरफडत उठली. जिना उतरताना, “आज शनिवार म्हणून उशिरापर्यंत झोपायचा आपला बेत होता” हे तिला आठवलं. तिच्या चरफडीचा पारा आणखी वर चढला.

जिन्याच्या शेवटच्या पायरीवर थांबून तिने हाऊस कोटाची बटणं लावली. ‘पहाटे उठून सडा घालायच्या काळात आपला जन्म झाला नाही किंवा अजून सडा घालत असणाऱ्या कुटुंबात आपलं लग्न झालं नाही, हे आपलं भाग्य !’ असा अनाठायी विचार रजनीच्या मनाला चाटून गेला.

डोळे किलकिले करून रजनीने दरवाजाच्या काचेतून भल्या पहाटे तिला उठवणाऱ्या गुन्हेगाराकडे बघितलं.

दरवाजात तिची कॉलेज कन्यका उभी होती. तिच्या दोन्ही बाजूला दोन ठासून भरलेल्या ट्रॅश बॅग्स पडलेल्या होत्या. बेलवरती बोट ठेवून ती सतत बेल दाबत होती.

नुकत्याच सासरी पाठवलेल्या मुलीचं अवेळी व अनपेक्षितपणाने माहेरी आगमन झालं तर आईला जसा धक्का बसेल तसाच रजनीला बसला. रजनीने दरवाजा उघडला.

“किती वेळ मी बेल वाजवत होते. एवढा वेळ कां लावलास दार उघडायला ?” रतीने गाठी मारून बंद केलेल्या प्लास्टिक बॅग्स खेचत घरात आणत विचारलं.

“नेहमीसारखी काळावेळाची तुला शुध्द नाही. मला झोपेतून उठवलंस आणि वर तक्रार करतेस ?”

“मला वाटलं होतं तुला मला बघून आनंद होईल. नेहमी तू लवकर उठतेस. आज झोपली होतीस कां ?”

“नाही, ध्यान लावून बसले होते.”

“ध्यान म्हणजे ?”

“तू यावेळी इथे कुठे उगवलीस ते सांग आधी.”

“इथं कुठे म्हणजे ? घरी आले.”

रजनीने संभाषणाचा रोख बदलला. “तुला सुट्टी आहे कां ?”

“आहे ना ! शनिवार रविवार”

“त्यासाठी तू ५०० मैल प्रवास करून घरी आलीस ?”

“हो. राइड मिळाली. आले. शिवाय मला ब्रूम हवा होता.”

“काय ?” रजनीने विचारलं.

जगात ब्रूम नावाची वस्तू असते ह्याचं ज्ञान आपल्या मुलीला आहे कां याबद्दल रजनीला शंका होती. “तुझ्या खोलीतला कचरा काढ” असं शंभर वेळा सांगितल्यावर ही मुलगी कारपेटवर अस्ताव्यस्त पसरलेल्या वस्तूंमधून एकदा घुई घुई व्हॅक्युम क्लिनर फिरवायची. हिला ब्रूमची उपरती कुठून व कां झाली हेच रजनीला समजेना. शेवटी तिने विचारलं, “ब्रूम कशाला ?”

“ब्रूम कशाला असतो ? कचडा काढायला.”

“कचडा नाही. कचरा. काय ग, अख्ख्या न्युयॉर्क स्टेटमध्ये ब्रूम मिळाला नाही कां तुला ?”

“अग, दुकानात जायला राइड नव्हती. घरी यायला होती. शिवाय ब्रूम घ्यायला पैसे नव्हते.”

“उद्या तू परत कशी जाणार ?”

“ममी तुझी भविष्यकाळाची काळजी करायची सवय गेलेली नाही.”

“उद्याची काळजी करतेय मी !”

“उद्या हा भविष्यकाळच आहे. आणि तू आणखी किती वेळ मला क्रॉस एक्झामिन करणार आहेस. माझ्याबरोबर मुलं आहेत. त्यांना भूक लागलीय. बोलावू का ब्रेकफास्टला ?”

“अर्थात्” रजनी पूर्ण जागी झाली.

रती सोबत्यांना बोलवायला बाहेर गेली तेव्हा रजनी हताशपणे तिच्याकडे बघत उभी राहिली - पिंजारलेले केस, ठिकठिकाणी फाटलेली किंवा मुद्दाम फाडलेली जीन. . . . . रजनीची आई प्रथम अमेरिकेत मुलीकडे चार महिने आली तेव्हा तिने विचारलेला प्रश्न रजनीला आठवला. “रजनी, तू तेल - फणी, शिवण - टिपण, केरकचरा काढणं ही कामं मुलीला शिकवायला विसरलीस वाटतं ?”

स्वतः सारखेच तीन तांबरलेल्या लाल डोळ्यांचे अवतार घेऊन रती परतली. रजनीने मुकाट्याने स्वैपाकघरात जाऊन बेकन मायक्रोवेव्हमध्ये टाकलं. रती व तिची मित्रमंडळी बाथरूमच्या दिशेने गेली. दिनेश उठून खाली आला. तो रजनीला सांगू लागला, “वरच्या खिडकीतून रतीचा रथ बघितला. स्कॉच टेप, रबर बँडस्, बँडेडस् व हँगर यांच्या सहाय्याने तो कसाबसा तग धरून आहे.”

“म्हणजे ?” रजनीने विचारलं.

“म्हणजे ती चलतीका नाम गाडीतली गाडी आहे.”

“कॉलेजमधल्या मुलांकडे दुसरं काय असणार ?” रजनीने विचारलं.

“तशा परिस्थितीतही आत्ता ५०० मैलांचा प्रवास करून आलाय तो रथ.”

“तो परत ५०० मैल कसा जाईल याचीच काळजी आहे मला. आणि काय ग तू रतीच्या मित्रमंडळींचं अंतिम ध्येय विचारलंस का ?” दिनेशने रथाची काळजी सोडून नवीन काळजी करायला सुरुवात केली.

“त्याच्याशी मला काय करायचंय ?”

“तुला नसेल काही करायचं पण मला आहे ना कर्तव्य त्यांच्या ध्येयाशी. ह्या रतीला अंतर, काळ, वेळ व दिशा याचं ज्ञान आहे का ? आत्ता मला बाजूला बोलावून म्हणेल, “डॅडी जेनीला टिंबकटूला जायचंय. जरा पोचवून याल का ?” टिंबकटू दोन मैलाच्या अंतरावर का दोनशे याचा विचारही ती करणार नाही.”

“तूच विचार तिला, रती… रती…” रजनीने हाका मारल्या. जांभया देत रती आली.

“काय ग तुझी ही गँग स्वतःच्या चाकानेच जाणार का पुढे ?” दिनेशने तिला विचारलं.

“लक्षात आहे माझ्या. तुम्हाला माझ्या मैत्रिणींना कुठेही पोचवायचा त्रास घ्यायला आवडत नाही ! ते जाणार आहेत स्वतःच” रती फणकारली.

“रती तुला दोन बाबतीत मॅच्युरिटी आलीय कॉलेजात गेल्या पासून. एक, कचरा काढणं, दोन आईवडिलांच्या गळ्यात मित्रमंडळींना पोचवण्याचं काम न मारणं” रजनी म्हणाली.

रजनीने रतीच्या गँगसमोर ऑरेंज ज्यूस, बेकन, अंडी, टोस्ट, सिरिअल, दूध, कॉफी व चहा हा नैवेद्य मांडला. जांभया देत त्यांनी तो मुकाट्याने संपवला व गुड बाय् म्हणत एकमेकांचा निरोप घेतला.

रती आपल्या बॅगा खेचत वॉशिंग मशिनच्या दिशेने निघाली.

“धुवायचे कपडे इथे कां आणलेस ? डॉर्ममध्येच धुवायचे होतेस” रजनी म्हणाली.

“डॉर्ममध्ये कपडे धुवायला पैसे पडतात. इथे पडत नाहीत. निदान मला तरी.” रतीने खुलासा केला.

“पैशाची किंमत समजली. तिसऱ्या बाबतीत मॅच्युरिटी आली” रजनी म्हणाली.

आता दिनेशने संभाषणाचे सुकाणू घेतलं… “रती दोन दिवसासाठी तू इतक्या लांब कां आलीस ?”

“ब्रूमसाठी” रती म्हणाली आणि बॅगा खेचत निघून गेली.

“हिची डॉर्ममधली खोली झाडणं शक्य आहे कां ?” दिनेशने विचारलं.

“तो तिचा प्रश्न आहे.” रजनीने निर्विकारपणे उत्तर दिलं. तरीसुध्दा रजनीला दिनेशचा प्रश्न योग्य आहे हे माहीत होतं ……… एकदा अकस्मात रजनीने व दिनेशने रतीला भेट दिली होती. तेव्हा रतीच्या खोलीत वॉल टू वॉल पुस्तकं, कपडे, शूज, सॉक्स, डिशेस्, कपस्, उशा अशा वस्तू पसरल्या होत्या. एवढंच नव्हे तर एक कपड्यांचा ढिगारा रजनीने बाजूला केला तेव्हा ‘म्याव’ करत एक मांजराचं पिल्लू त्या ढिगाऱ्याखालून बाहेर पडलं होतं.

रती कपडे वॉशिंग मशीनमध्ये घालून होताच बाथरूममध्ये घुसली. तासाने ती बाहेर आली तेव्हा बाथरूमचा सोना (sauna)झाला होता. “स्वच्छ, स्वच्छ वाटतय” रती म्हणाली व बेडरूममध्ये अंतर्धान पावली.

संध्याकाळी पाच वाजता दिनेश म्हणाला, “रतीला तिच्या आवडत्या इटालियन रेस्टॉरंटमध्ये डिनरला नेऊ या.” रजनीने रतीला उठवलं. “रती तुला इटालियन रेस्टॉरंटमध्ये जायचय कां ?”

“मला वरण-भात आणि मुगाची उसळ हवीय” रती म्हणाली.

“तुला आपलं जेवण हवय ? आश्चर्य ! आश्चर्य ! महा आश्चर्य” रजनी म्हणाली. “तू मॅच्युरिटीचे कळसावर कळस चढवतेस.”

“कळस म्हणजे ?” रतीने विचारलं.

“डोम” रजनीला बरोबर शब्द सुचेना.

“मॅच्युरिटीचा डोम” रती म्हणाली आणि झोपून गेली. जेवल्यावर रती परत झोपली. रविवारी अकरा वाजता रजनीने तिला उठवलं. “तुझ्या कारवाल्या मैत्रिणीचा फोन आला होता. ती एक वाजता तुला न्यायला येतेय.”

“मला आधी कां उठवलं नाहीस ? ब्रूम विकत आणायचाय.”

“घरातलाच ने” रजनीने सुचवलं.

रतीची दया येऊन रजनीने तिचे दोन्ही ट्रॅश बॅगमधले कपडे धुऊन ठेवले होते. ते रतीने परत ट्रॅश बॅगमध्ये भरले. रजनीने तयार करून ठेवलेला ब्रेकफास्ट संपवला. मग आणखी एक ट्रॅश बॅग घेऊन ती क्लिनिंग क्लॉजेटमध्ये पाच मिनिटं खुडबुडून बाहेर आली.

“बॅगेत काय घेतलंस ?” रजनीने विचारलं.

“एजॅक्स, फर्निचर पॉलिश, फ्लोअर क्लिनर, स्पाँजेस, फॅन्टस्टिक” रतीने यादी सांगितली.

गदेसारखी ब्रूम खांद्यावर धरून तीन ट्रॅश बॅगस् सांभाळत रती चलती का नाम गाडीत बसून परत कॉलेजला गेली. रात्री ती पोचल्याचा फोन येईपर्यंत दिनेश अस्वस्थ होता.

दोन आठवड्यांनी दिनेशला व रजनीला अकस्मात न्यूयॉर्कला जावं लागलं. त्या दोघांनी रतीलाही धावती भेट दिली… रतीच्या खोलीत अस्ताव्यस्त पसरलेल्या वस्तूंत तिने आणलेल्या एजॅक्स, फर्निचर पॉलिश इत्यादींची आता भर पडली होती. खोलीच्या कोपऱ्यात हिरमुसला ब्रूम उलटा, डोकं खाली पाय वर अशा परिस्थितीत उभा होता.

रजनीने सुस्कारा सोडला. “तू तुझी खोली जरी स्वच्छ झाडली नाहीस तरी ती झाडायला हवी एवढी जाणीव तुला झालीय याचाच आनंद मानायला हवा मला” रजनी रतीला म्हणाली.

“माझ्यासारखे मॅच्युरिटीचे डोमस् तू चढवत नसलीस तरी सुद्धा तुला मॅच्युरिटी यायला सुरवात झालीसं दिसतंय” रती मिस्किलपणे हसत आपल्या आईला म्हणाली.

पूर्वप्रसिद्धी, एकता टोरोंटो कॅनडा

थालियाची थाली, मौज प्रकाशन, ८ मार्च २०१६